

# || गण गण गणात बोते ||

# संत श्री गजानन महाराजांचा १४० वा प्रकटदीन सोहळा

श्री गजानन महाराजांचा जन्म कुठे व कधी झाला हे अज्ञात आहे. परंतु गजानन महाराज माघ वद्य ७ शके १८०० , २३ फेब्रुवारी १८७८ या दिवशी ऐन तारुण्यात ते शेगांव जि. बुलढाणा येथे दिगंबरावस्थेत दृष्टीस पडले . त्या वेळी ते देवीदास पातुरकरांच्या मठाबाहेर उष्ट्या पत्रावळीतील शिते उचलून खात होते. ह्या संदर्भात दासगणूंनी लिहिले आहे, "कोण हा कोठीचा काहीच कळेना। ब्रह्माचा ठिकाणा कोण सांगे । साक्षात ही आहे परब्रह्ममूर्ती। आलीसे प्रचिती बहुतांना ।।"

जसा कुशल जवाहीर कोळशाच्या तुकड्यांमधून अनमोल हिरा शोधून काढतो त्याप्रमाणे बंकटलाल आगरवाल ह्याने त्यांचे महत्त्व ओळखले. त्याला महाराजांचे प्रथम दर्शन झाले ते असे,-

*"दंड गर्दन पिळदार । भव्य छाती दृष्टी स्थिर ।*
*भृकुटी ठायी झाली असे ।।"*

जेव्हा बंकटलालने त्यांना जेवणाविषयी विचारले त्यावेळी महाराजांनी नुसतेच शून्य दृष्टीने त्याच्याकडे पाहिले. कारण महाराज त्यावेळी तुर्या* अवस्थेत होते. (तुर्या* अवस्था: जागृति म्हणजे जागे असणे, सुषुप्ति म्हणगे झोपणे आणि स्वप्नावस्था ह्या तीन अवस्थांच्या पलीकडील स्थितीस तुर्या अवस्था अथवा व्रह्मस्थिति अथवा सहजसमाधि असे म्हणतात)

महाराज एक महान आणि असामान्य असे योगी आहेत ह्याची बंकटलालला तत्काळ आणि मनोमन खात्री पटली. त्या महान भक्ताने त्यांचे श्रेष्ठत्व ओळखून त्यांना स्वगृही आणले. जेथे संतांचा वास तेथेच भगवंताचा निवास, ह्या उक्तीप्रमाणे,

*"बंकटलालाचे घर। झाले असे पंढरपूर ।*
*लांबलांबूनीया दर्शनास येती नारी-नर ।*
*लोक ते पावती समाधान ।।"*

बंकटलालाचे घर भक्तांनी दुमदुमून गेले. जरी पहिले काही महिने श्री गजानन महाराज बंकटलालाकडे राहिले तरी देखिल सच्च्या परमहंस संन्याशाप्रमाणे काही कालानंतर त्यांनी त्यांचे वास्तव्य तिथून बदलून गावातील मारुतीच्या मंदिरात

केले. संत हे उपाधिरहित असल्याकारणाने गजानन महाराजदेखिल उपाधिपासून दूर राहण्याकरिता अनेक वेळा मठ सोडून कुठेतरी भटकंती करण्यास निघून जात. शेगांवात राहून महाराजांनी अनेक लीला करून लोकांचे कल्याण केले व त्यांना भक्तीमार्गाला लावले.

सद्गुरू अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ हे गजानन महाराजांचे सद्गुरू होते. या संदर्भात असे सांगितले जाते की ज्या दिवशी तरूण वयातील गजानन महाराज श्री स्वामींना भेटण्यास अक्कलकोटला येणार होते त्यादिवशी श्री स्वामी अतिशय आनंदात होते. तसेच दुरून गजानन महाराजांना (१७-१८ वर्षे वयाचे) येताना पाहून ते अतिशय आनंदाने उद्गारले, "गणपती आला रे!" त्यावर त्यांनी गजानन महाराजांना स्वतःच्या मांडीवर बसवून घेऊन त्यांचे प्रेमाने स्वागत केले. असे सांगितले जाते की केवळ एकच महिना गजानन महाराजांना स्वतःजवळ ठेऊन घेतल्यानंतर श्री स्वामींनी तारुण्यावस्थेतील गजानन महाराजांना आध्यात्मिक कार्याची दिशा दाखविण्यासाठी सटाणा येथील थोर सत्पुरूष देव मामलेदार यांच्याकडे पाठवले. देव मामलेदारांनी महाराजांची अध्यात्मविषयक जाणीव समृद्ध केली आणि पुढील कार्याची दिशा व स्वरूप स्पष्ट करून सांगितले. त्यांच्याच सूचनेनुसार महाराजांनी पुढे आपले कार्यक्षेत्र शेगांव येथे निश्चित केले.

देह त्याग करण्यापूर्वी महाराज म्हणाले,


"मी गेलो ऐसे मानू नका। भक्तित अंतर करू नका।
कदा मजलागी विसरु नका। मी आहे येथेच ॥"
"दुःख न करावे यत्किंचित।आम्ही आहोत येथेच।
तुम्हा सांभाळण्यापरी सत्य। तुमचा विसर पडणे नसे ॥."

त्यामुळेच जरी गजानन महाराजांनी समाधी घेतली तरी आजही त्यांच्या भक्तांना त्यांची कृपा, प्रेम, आशीर्वाद आणि मार्गदर्शन लाभत आहे.

*॥ गण गण गणांत बोते ॥*

*॥ जय गजानन ॥*

# "जय गजानन आरती संग्रह"



## ॥ श्री गणपतीची आरती ॥

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगी सुन्दर उटि शेंदुराची। कण्ठी झळके माळ मुक्ताफळांची॥ १ ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ति। दर्शनमात्रे मनकामना पुरती॥ ध्रु॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चन्दनाची उटि कुंकुमकेशरा।
हिरे जड़ित मुकुट शोभतो बरा। रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया॥ २ ॥

लम्बोदर पीताम्बर फणिवर बन्धना। सरळ सोण्ड वक्रतुण्ड त्रिनयना।
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना॥३॥

## ॥ श्री दत्ताची आरती ॥

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।
नेती नेती शब्द न ये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥ १ ॥

जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता।
आरती ओवाळीतां हरली भवचिन्ता ॥ ध्रु ॥

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त। अभाग्यासी कैसी न कळे ही मात।
पराही परतली तेथे कैचा हेत। जन्ममरणाचा पुरलासे अन्त ॥ २ ॥

दत्त येऊनियां ऊभा ठाकला। सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला।
प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला। जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ ३ ॥

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हरपलें मन झालें उन्मन।
मी तू पणाची झाली बोळवण। एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥

## ॥ श्री मारुतीची आरती ॥

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं।
करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं ॥
गडबडिलें ब्रह्मांड धाकें त्रिभुवनीं।
सुरवर नर निशाचर त्यां झाल्या पळणी ॥ १ ॥

जय देव जय देव जय हनुमंता।
तुमचे नि प्रसादें न भीं कृतांता ॥ ध्रु० ॥

दुमदुमिलीं पाताळें उठिला प्रतिशब्द।
थरथरला धरणीधर मानीला खेद ॥
कडकडिले पर्वत उड्डगण उच्छेद ॥
रामीं रामदासा शक्तिचा बोध ॥ जय देव० ॥ २ ॥

# ॥ आरती श्री गजाननाची ॥

जय जय सच्चित्स्वरूपा स्वामी गणराया ।
अवतरलासी भूवर जडमुढ ताराया ।
॥ जयदेव जयदेव ॥धृ॥

निर्गुण ब्रह्म सनातन अव्यय अविनाशी ।
स्थिरचर व्यापून उरलें जे या जगताशी ।
तें तूं तत्त्व खरोखर निःसंशय अससी ।
लीलामात्रें धरिलें मानवदेहासी ।
॥ जयदेव जयदेव ॥१॥

होऊं न देशी त्याची जाणिव तूं कवणा ।
करूनी 'गणि गण गणांत बोते' या भजना ।
धाता हरिहर गुरुवर तूंचि सुखसदना ।
जिकडें पहावे तिकडे तूं दिससी नयना ।
॥ जयदेव जयदेव ॥२॥

लीला अनंत केल्या बंकट सदनास ।
पेटविलें त्या अग्नीवांचूनी चिलमेस ।
क्षणांत आणिलें जीवन निर्जल वापीस ।
केला ब्रह्मगिरीच्या गर्वाचा नाश ।
॥ जयदेव जयदेव ॥३॥

व्याधी वारून केलें कैकां संपन्न ।
करविले भक्तालागी विठ्ठलदर्शन ।-
भवसिंधू हा तरण्या नौका तव चरण ।
स्वामी दासगणूचे मान्य करा कवन ।
॥ जयदेव जयदेव ॥४॥

## ॥ आरती सदगुरुनाथाची ॥

आरती सदगुरू नाथा । अवलीया समर्था ।
आरती ओवाळीतो । मनोभावे मी आता । आरती सद्गुरू नाथा ॥धृ॥
दिधले निजभक्ता । भावे इच्छीत फल त्वा ।
पाजुनि ज्ञानामृता । उध्दरिले समर्था । आरती सदगुरू नाथा ॥१॥
कविजन गुण गाता । थकियले समर्था ।
अघटित ऐसी लिला । मति धजि ही न आता । आरती सदगुरू नाथा ॥२॥
विनंती भगवंता । तारी रामात्मज आता ।
आरती पूर्ण करितो । शरणागत बलवंता । आरती सद्गुरू नाथा ॥३॥

## ॥ प्रार्थना ॥

घालीन लोटांगण वंदिन चरणं | डोळ्यांनी पाहीन रूप तुझे हे |
प्रेमे आलिंगन आनंदे पूजिन | भावे ओवाळीन म्हणे नमः || १ ||
त्वमेव माता पिता त्वमेव | त्वमेव बंधुश्र्च सखा त्वमेव |
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव | त्वमेव सर्वं ममदेव देव || २ ||
कायेन वाचा मासेन्द्रीयेर्वा | बुध्यान्त्माना वा प्रकृती स्वभावात |
करोमि यद्यत सकलं परस्मे | नारायानायति समर्पयामि || ३ ||
अचयुत केशवं रामणारायणं | क्कृष्ण दामोदरं वासुदेवं हरी |
श्रीधरं माधवं गोपिका वल्लभं जानकी नायकं रामचन्द्रम भजे || ४ ||
हरे राम हरे राम राम राम हरे हरे |
हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्ण कृष्ण हरे हरे |
हरे राम हरे राम राम राम हरे हरे |
हरे कृष्णा हरे कृष्णा कृष्ण कृष्ण हरे हरे ||

## || श्लोक (भुजंगप्रयात) ||

सदा सर्वदा योग तुझा घडावा | तुझे कारणी देह माझा पडावा |
उपेक्षु नको गुणवंता अनंता | रघु नायका मागणे हेची आता ||
उपासनेला दृढ चालवावे | भूदेव संतांसी सदा लावावे |
सत्कर्म योगे वय घालवावे | सर्वांमुखी मंगल बोलवावे ||

## || वृत्त (इंद्रवज्रा) ||

ज्या ज्या स्थळी हे मन जय माझे | त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे |
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी | तेथे सद्गुरू तुझे पाय दोन्ही ||
जय जय रघुवीर समर्थ ||

## || वीश्व-प्रार्थना ||

हे ईश्वरा सर्वांना चांगली बुद्धी दे आरोग्य दे |
सर्वांना सुखात ठेव आनंदात ठेव ऐश्वर्यात ठेव ||
सर्वांच भालं कर कल्याण कर रक्षण कर |
आणि तुझे गोड नाम मुखात अखंड राहू दे ||

|| अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज
परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक
शेगांव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय ||

## || प्रदक्षिणा ||


यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च |
तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिणं पदे पदे ||

*****

## ॥ मंत्रपुष्पांजली ॥

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवः॥
ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ॥
स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ॥
ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ट्यं राज्यं
महाराज्यमाधिपत्यमयं समन्त पर्यायीस्यात् सार्वभौमः सार्वायुष
आन्तादापरार्धात पृथिव्यै समुद्रपर्यान्ताया एकराळिति ।
तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुतस्याऽवसन् गृहे ॥
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥ तन्नो सद्गुरू प्रचोदयात् ॥
ॐ पूर्ण ब्रह्माय धीमहि, तन्नो सद्गुरू प्रचोदयात् ॥

*****





“गण गण
गणात बोते…!!!”

## || श्री गजानन दुर्वांकुर: २१ नमस्कार ||

शेगांव ग्रामी वसले गजानन
स्मरणे तयांच्या हरतील विघ्न
म्हणुनी स्मरा अंतरी सद्गुरूला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१||

तेऊनि तेथे अकस्मात मूर्ती
करी भाविकांच्या मनाचीच पूर्ती
म्हणुनी स्मरा अंतरी सद्गुरूला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||२||

उन्हातहानेची नसे त्यास खंत
दाविले सत्य आशेची संत
पाहुनी त्या चकित बंकाटलाल झाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||३||

घेउनी गेला आपुल्या गृहासि
मनोभावे तो करी पूजनासी
कृपा प्रसादे बहुलाभ झाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||४||

मारानोंमुखी तो असे जानराव
तयांच्यामुळे लाभला त्यास जीव
पदतीर्थ घेता पुनर्जन्म झाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||५||

पहा शुष्कवापी भरली जलाने
चिलीम पेटविली तये अग्निविणे
चिंचवणे नाशिले करी अमृताला
नमस्कार माझा श्री गाजानानाला ||६||

ब्राम्हगीरीला असे गर्व मोठा
करी तो प्रचारा अर्थ लाऊनि खोटा
क्षणार्धात त्याचा परिहार केला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||७||

बागेतली जाती खाण्यास कणसं
धुरामुळे करिती मक्षिका त्यास दंश
योगबले काढीले कान्टकाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||८||

भाक्तांपरी प्रीत असे अपार
धावुनी जाती तया देती धीर
पुंडलिकाचा ज्वर तो निमाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||९||

बुडताच नौका नर्मदेच्या जलात
धावा करिती तुमचाची भक्त
स्त्रीवेष घेउनी तिने धीर दिला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||१०||

संसार त्यागीयेला बायाजाने
गजानन सानिध्य वाहि जिने
सदा स्मरे ती गुरुच्या पदाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||११||

पितांबरा करी भारी उदकात तुंबा
पाणी नसे भारविन्या नाल्यास तुंबा
गुरु कृपेने तो तुंबा बुडाला
नमस्कार माझा श्री गाजाननाला ||१२||

हरित पर्ण फुटले शुष्क अम्रवृक्षा
पितांबराची घेत गुरुपरीक्षा
गुरुकृपा लाभली पितांबराला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१३||

चिलीम पाजावी म्हणुनी श्रींशी
इच्छा मनी जाहली भिक्षुकासी
हेतू तयाचा अंतरी जाणियेला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१४||

बाळकृष्णघरी त्या बळापुरासि
समर्थ रूपे दिले दर्शनासि
सज्जन गडाहुनि धाउनी आला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१५||

नैवेद्य पकवान बहु अनियेले
कांदा भाकारीसी तुम्ही प्रिय केले
कवरांसी पाहुनी आनंद झाला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१६||

गाडी तुम्ही थांबविली दयाळा
गरुडा प्रति दाविलीये हो लीला
क्षणार्धात त्याचा परिहार केला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१७||

जातिधर्म नाही तुम्ही पाळीयेला
फकीरासवे हो तुम्ही जेवियेला
दाऊनि ऐसे जना बोध केला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१८||

अग्रवालास संगे म्हणे राममूर्ती
अकोल्यास स्थापूनी करी दिव्य कीर्ती
सांगता क्षणी तो पहा मानियेला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||१९||

करंजपूरीचा असे विप्र एक
उदरी तयांच्या असे हो की दुःख
दुःखातूनि तो पहा मुक्त झाला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||२०||

दुर्वांकुरा वाहुनी एकवीस
नमस्कार रूपी श्री गजाननास
सख्यादास वाही श्रीगुरुच्या पदाला
नमस्कार माझा श्री गजाननाला ||२१||

*****



## || कार्पूरार्ती ||

जयजय कर्पूरगौरा | तारी जयजय कर्पूरगौरा ||धृ||
भस्म हे चर्चित निल गलांबर झल्लालती रूंडमाळा ||
इंदु लल्लाटी शोभतसे कटी | गजचर्म व्याघ्रांबरा |
शंभो जयजय कर्पूरगौरा ||१ ||

श्वेतासनी महाराज विराजित | अंकी बसे सुंदरा |
भक्त दयाघन वंदिती चरण | धन्य तु लीलावतारा |
शंभो जयजय कर्पूरगौरा || २ ||

मतिमंद दीन झालो पदी लीन | पार करी संसारा |
काशीसूतात्मज मागतसे तुज | द्या चरणी मज थारा ||
शंभो जयजय कर्पूरगौरा ||३||

कर्पूरगौरं करूणावतारं | संसारसारं भुजगेंद्रहारं |
सदा वसंतं ह्दयारविंदे | भवं भवान्यासाहित नमामि ||
मंदारमाला कपाल काय | दिगंबराय दिगंबराय ||

**!! गण गण गणात बोते !!**

*****

# श्री गजानन महाराज अष्टक (दासगणूकृत)

गजानना गुणागरा परम मंगला पावना।
अशीच अवघें हरी, दुरीत तेंवि दुर्वासना॥
नसे त्रिभुवनामधे तुजविणे आम्हां आसरा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥१॥

निरालसपणें नसे घडलि अल्प सेवा करीं।
तुझी पतितपावना भटकलों वृथा भूवरी।
विसंबत न गाय ती आपुलिया कधीं वासरा।
करी पदनातावरी बहु दया न रोषा धरा॥२॥

अलास जगी लावण्या परतुनी सु-वाटे जन।
समर्थ गुरुराज ज्या भुषवि नाम नारायण॥
म्हणून तुज प्रार्थना सतत जोडुनिया करा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥३॥

क्षणांत जल आणिलें नसून थेंब त्या वापिला।
क्षणांत गमनाप्रती करिसि इच्छिलेल्या स्थला।
क्षणांत स्वरूपे किती विविध धरिसी धीवरा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥४॥

अगाध करणी तुझी गुरुवरा ! न लोकां कळे।
तुला त्यजुनी व्यर्थ ते अचरितात नाना खुळे।
कृपा उदक मागती त्यजुनी गौतमीच्या तिरा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥५॥

समर्थस्वरूपप्रती धरून साच बाळापुरी।
तुम्ही प्रगट जाहलां सुशिल बाळकृष्णा घरीं।
हरिस्वरूप घेऊनि दिधली भेट भीमातिरा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥६॥

सछिद्र नौकेप्रती त्वदिय पाय हे लागतां।
जलांत बुडता तरी तिजसी नर्मदा दे हाता।
अशा तुजसि वाणण्या नच समर्थ माझी गिरा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥७॥

अतां न बहु बोलतां तव पदांबुजा वंदितों।
पडो विसर ना कदा मदिय हेंचि मी मागतों।
तुम्ही वरद आपुला कर धरा गणूच्या शिरा।
करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा॥८॥



# !!...गजानन बावन्नी...!!

जय जय सदगुरू गजानना | रक्षक तूची भक्तजना ||१||
निर्गुण तू परमात्मा तू | सगुण रुपात गजानन तू ||२||
सदेह तू, परी विदेह तू | देह असून देहातीत तू ||३||
माघा वैद्य सप्तमी दिनी | शेगावात प्रगटोनी ||४||
उष्ट्या पत्रावालीनिमित्त | विदेहत्व तव हो प्रगट ||५||
बंकट लालावारी तुझी | कृपा जाहली ती साची ||६||
गोसाव्याच्या नवसासाठी | गांजा घेसी लावून ओठी ||७||
तव पद तीर्थे वाचविला | जानराव तो भक्त भला ||८||
जानाकीरामा चिंच वणे | नासावोनी स्वरूपी आणणे ||९||
मुकीन चंदूचे कानवले | खाउन कृतार्थ त्या केले ||१०||
विहिरी माजी जलविहीना | केले देवा जल भरणा ||११||
मध माश्यांचे डंख तुवा | सहन सुखे केले देवा ||१२||
त्यांचे काटे योगबले | काढुनी सहजी दाखविले ||१३||
कुस्ती हरीशी खेळोनि | शक्ती दर्शन घडवोनी ||१४||
वेद म्हणुनी दाखविला | चकित द्रविड ब्राह्मण झाला ||१५||
जळत्या पर्याकावरती | ब्रहम्हगीरीला ये प्रचीती ||१६||
टाकळीकर हरिदासाचा | अश्व शांत केला साचा ||१७||
बाळकृष्ण बाळापुराचा | समर्थ भक्ताची जो होता ||१८||
रामदास रूपे तुला | दर्शन देवोनी तोषविला ||१९||
सुकुलालाची गोमाता | द्वाड बहु होती ताता ||२०||
कृपा तुझी होताच क्षणी | शांत जाहली ती जननी ||२१||
घुडे लक्ष्मण शेगावी | येता व्याधी तू निरवी ||२२||
दांभिकता परी ती त्याची | तू न चालवोनी घे साची ||२३||
भास्कर पाटील तव भक्त | उद्धरलासी तू त्वरित ||२४||
आज्ञा तव शिरसावंद्य | काकाही मानती तुज वंद्य ||२५||
विहिरीमाजी रक्षियला | देवा तू गणू जवरयाला ||२६||
पिताम्बराकार्वी लीला | वठला आंबा पल्लवीला ||२७||

सुबुद्धी देशी जोश्याला | माफ करी तो दंडाला ||२८||
सवडत येशील गंगाभारती | थुंकून वारिली रक्तपिती ||२९||
पुंडलिकाचे गंडांतर | निष्टा जाणून केले दूर ||३०||
ओंकारेश्वरी फुटली नौका | तारी नर्मदा क्षणात एका ||३१||
माधवनाथा समवेत | केले भोजन अदृष्ट ||३२||
लोकमान्य त्या टिळकांना | प्रसाद तूची पाठविला ||३३||
कवर सुताची कांदा भाकर | भक्शिलास तू त्या प्रेमाखातर ||३४||
नग्न बैसोनी गाडीत | लीला दाविली विपरीत ||३५||
बायजे चित्ती तव भक्ती | पुंडलीकावारी विरक्त प्रीती ||३६||
बापुना मनी विठल भक्ती | स्वये होशी तू विठ्ठल मूर्ती ||३७||
कवठ्याच्या त्या वारकऱ्याला | मरीपासुनी वाचविला ||३८||
वासुदेव यती तुज भेटे | प्रेमाची ती खुण पटे ||३९||
उद्धट झाला हवालदार | भस्मीभूत झाले घरदार ||४०||
देहान्ताच्या नंतरही | कितीजना अनुभव येई ||४१||
पडत्या मजूर झेलीयेले | बघती जन आश्चर्य भले ||४२||
अंगावरती खांब पडे | स्त्री वांचे आश्चर्य घडे ||४३||
गजाननाच्या अद्भुत लीला | अनुभव येती आज मितीला ||४४||
शरण जाऊनी गजानना | दुक्ख तयाते करी कथना ||४५||
कृपा करी तो भक्तांसी | धावून येतो वेगेसी ||४६||
गजाननाची बावन्नी | नित्य असावी ध्यानी मनी ||४७||
बावन्न गुरुवार नेमे | करी पाठ बहु भक्तीने ||४८||
विघ्ने सारी पळती दूर | सर्व सुखांचा येई पूर ||४९||
चिंता सारया दूर करी | संकटातूनी पार करी ||५०||
सदाचार रत साद भक्ता | फळ लाभे बघता बघता ||५१||
सुरेश बोले जय बोला | गजाननाची जय बोला ||
जय बोला हो जय बोला | गजाननाची जय बोला ||५२||

**अनंतकोटी ब्रम्हांडनायक माहाराजाधीराज योगीराज पराब्रम्ह सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज कि जय...!!!**

# गण गण गणात बोते (भजन)

गण गण गणात बोते हे भजन प्रिय सदगूरूते
या श्रेष्ठ गजानन गुरुते तुम्ही आठवीत राहा याते ||

हे स्तोत्र नसे अमृत ते मंत्राची योग्यता याते
हे संजीवन आहे नुसते व्यावहारीक अर्थ न याते ||१||

मंत्राची योग्यता कळते जो खराच मांत्रिक त्याते
या पाठे दुःख ते हरते पाठका अती सूख होते ||

हा खचित अनुग्रह केला श्रीगाजानाने तुम्हाला
घ्या साधून अवघे याला मनी धरून भाव भक्तीला ||२ ||

कल्याण निरंतर होई
दुःख ते मुळी नच राही ||

असल्यास रोग तो जाई वासना सर्व पुरातीलहि
आहे याचा अनुभव आला म्हणूनिया कथित तुम्हाला ||

तुम्ही बसून क्षेत्र शेगावी स्तोत्राची प्रचिती पहावी
ही दंतकथा ना लवहि या गजाननाची ग्वाही ||३ ||

|| इति समर्थ सदगुरु श्री गजानन महाराज की जय ||

*****

# || श्री भीमरूपी मारुती स्तोत्र ||

भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती ।
वनारी अन्जनीसूता रामदूता प्रभंजना ॥१॥

महाबळी प्राणदाता सकळां उठवी बळें ।
सौख्यकारी दुःखहारी (शोककर्ता) (धूर्त)
दूत वैष्णव गायका ॥२॥

दीननाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा ।
पातालदेवताहंता भव्यसिंदूरलेपना ॥३॥

लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका
॥४॥

ध्वजांगें उचली बाहो आवेशें लोटला पुढें ।
काळाग्नि काळरुद्राग्नि देखतां कांपती
भयें ॥५॥

ब्रह्मांडें माइलीं नेणों आंवाळे दंतपंगती ।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा भ्रुकुटी ताठिल्या
बळें ॥६॥

पुच्छ तें मुरडिलें माथां किरीटी कुंडलें बरीं ।
सुवर्ण कटि कांसोटी घंटा किंकिणि नागरा
॥७॥

ठकारे पर्वता ऐसा नेटका सडपातळू ।
चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी
॥८॥

कोटिच्या कोटि उड्डाणें झेंपावे उत्तरेकडे ।
मंदाद्रीसारखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें
॥९॥

आणिला मागुतीं नेला
आला गेला मनोगती |
मनासी टाकिलें मागें गतीसी
तूळणा नसे ॥१०॥

अणूपासोनि ब्रह्मांडाएवढा होत जातसे ।
तयासी तुळणा कोठें
मेरु- मांदार धाकुटे ॥११॥

ब्रंम्हांडाभोवते वेढे, वज्रपुच्छें करुं शके |
तयासी तुळना कैची,
ब्रम्हांडी पाहता नसे ||१२||

आरक्त देखिले डोळां ग्रासिलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडळा
॥१३॥

धनधान्य पशुवृद्धि पुत्रपौत्र समग्रही ।
पावती रूपविद्यादि
स्तोत्रपाठें करूनियां ॥१४॥

भूतप्रेतसमंधादि रोगव्याधि समस्तही ।
नासती तुटती चिंता
आनंदे भीमदर्शनें ॥१५॥

हे धरा पंधराश्लोकी लाभली शोभली बरी ।
दृढदेहो निःसंदेहो
संख्या चंद्रकला गुणें ॥१६॥

रामदासीं अग्रगण्यू कपिकुळासि मंडणू ।
रामरूपी अन्तरात्मा दर्शने दोष नासती
॥१७॥

॥ इति श्री रामदासकृतं संकटनिरसनं मारुतिस्तोत्रम् संपूर्णम् ॥

॥ मनोजवं मारुततुल्य वेगं, जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठं
वाताजकं वानर युद्ध मुख्यं, श्रीराम दूतं चरणम तपस्वी ॥

# ॥ पसायदान ॥

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनिं मज ज्ञावे । पसायदान हें ॥

जें खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी- रती वाढो ।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचें ॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्यें पाहो ।
जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥

वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकी ।
भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।


येथ म्हणे श्री विश्वेशराओ । हा होईल दान पसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥

*****

## ॥ क्षमापनम् ॥

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात्कारूण्यभावेन रक्षरक्ष परमेश्वर ।
मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वर ।
यत्पुजितं मया देव परिपूर्ण तदस्तु मे ।
आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम् ।
पुजां चैव न जानामि क्षमस्व परमेश्वर ॥
श्री समर्थ सद्गुरू गजानन महाराज की जय ॥

**॥ अनंतकोटी ब्रह्मांडनायक महाराजाधिराज योगीराज परब्रह्म सच्चिदानंद भक्तप्रतिपालक शेगांव निवासी समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज की जय ॥**




***- संत श्री गजानन महाराज मंदिर, माले.***